# दि हायकोर्ट एम्प्लॉईज को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई

## नोटीस

प्रति,
सभासद,
**दि हायकोर्ट एम्प्लॉईज को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, मुंबई**

वरील सोसायटीची ९१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दि. २४ ऑगस्ट २०२१ रोजी सायंकाळी ठिक ५.१० वाजता उच्च न्यायालयाच्या मुख्य इमारतीमधील ६ क्रमांकाच्या खोलीमध्ये होणार आहे. त्यावेळी खालील कामे करण्यात येतील.

१. गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. वार्षिक सर्वसाधारण सभेस गैरहजर असणाऱ्या सभासदांची रजा क्षमापित करणे.

३. आर्थिक वर्ष २०१९–२०च्या वैधानिक लेखापरिक्षणाच्या दोष दुरुस्ती अहवालास मंजूरी देणे.

४. दि.३१/०३/२०२१ अखेर संपणाऱ्या वर्षाचा सोसायटीचा वार्षिक अहवाल, नफा–तोटा, ताळेबंद पत्रके वाचुन मंजूर करणे.

५. सन २०२०–२०२१ च्या वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल आणि सन २०२०–२०२१ या वर्षाचा अंतर्गत लेखा परिक्षकांचा अहवाल वाचुन स्विकृत करणे.

६. सन २०२०–२०२१ या सालामध्ये झालेल्या नफ्याची वाटणी मंजूर करणे.

७. सन २०२१–२०२२ या वर्षाकरिता अंतर्गत आणि वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

८. सन २०२१–२०२२ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.

९. सोसायटीच्या पोटनियमांमध्ये सुचविलेल्या दुरुस्त्या मंजूर करणे. (पान क्र. ११ ते १६)

१०. अध्यक्षांच्या परवानगीने इतर कामे पुढे आल्यास त्यांचा विचार करणे.

**ता. ०६ ऑगस्ट २०२१** **श्री. दी. शं. धुमाळ : कार्यवाह**

**वि. सूचना :**

१. गणसंख्येपूर्ती अभावी तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व तिला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२. दि. २७/१०/२०२० रोजी झालेल्या वार्षिक सभेचे इतिवृत्त, आर्थिक वर्ष २०१९–२० चा वैधानिक लेखापरिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल, सन २०२०–२१ सालचा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, सन २०२०–२०२१ सालचा अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल त्याचप्रमाणे हिशेब तपासनिसांनी तपासलेले संस्थेचे हिशेब सभासदांच्या निरीक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयात दि.१७/०८/२०२१ ते २०/०८/२०२१ पर्यंत कार्यालयीन कामकाजाचे वेळेत उपलब्ध आहेत.

३. वार्षिक सभेमध्ये ज्या सभासदास प्रश्न विचारायचे असतील किंवा माहिती हवी असेल तर तत्संबंधी दि. २१ ऑगस्ट २०२१ च्या आत कार्यालयात लेखी कळविण्याबद्दल विनंती आहे. अकस्मात विचारलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.

४. सभासदांचे लक्ष वेधण्यात येते की, नफा वाटणीची रक्कम मंजूर झालेल्या तारखेनुसार ३ वर्षांच्या आत न नेल्यास ती रक्कम राखीव निधीमध्ये जमा करावी लागते.